<u>नियमित फौजदारी खटला क्र.५२/२०१७ मधील निशाणी ३७ खालील आदेश</u>
<u>(पारीत दिनांक १४.०६.२०१९)</u>
**<u>CNR No.MHAU050002092017</u>**

१. प्रस्तुतचा अर्ज आरोपी क्र.४ ने प्रकरणातून दोषमुक्त होण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. अर्ज व त्यावरती अभियोग पक्षाच्या वतीने दाखल केलेल्या जबाबाचे अवलोकन केले.

३. आरोपी क्र.४ तर्फे विव्दान वकील श्री.व्ही.जे.सवई व अभियोग पक्षातर्फे विव्दान सरकारी वकील श्री.एस.ए.बनसोडे यांचा युक्तिवाद ऐकला.

४. आरोपी क्र.४ चे थोडक्यात कथन असे की, आरोपी क्र.१ योगेश व फिर्यादी योगिता यांचे लग्न दिनांक २८.०५.२०१५ रोजी झालेले आहे. लग्नानंतर सर्व काही सुरळीत चालु असताना फिर्यादी योगिता ही सासरच्या लोकांना त्रास देण्यासाठी पोलीस स्टेशनला केस करण्याची धमकी देवून खोटी फिर्याद दाखल केलेली आहे. आरोपी क्र.१ व फिर्यादी यांच्या लग्नाच्या पूर्वीपासून तो शिक्षणासाठी सतत बाहेरगावी होता. तसेच लग्नाच्या वेळी तो सैन्यदलामध्ये नोकरीस होता व त्याचे प्रशिक्षण चालु होते. सध्या तो केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल नवी दिल्ली येथे पॅरा मिलिटरी फोर्स म्हणून कार्यरत आहे. फिर्यादीने केलेले आरोप बिनबुडाचे आहेत त्यामुळे त्याला या प्रकरणातून दोषमुक्त करण्याची विनंती केलेली आहे.

५. याउलट विव्दान सहा.सरकारी वकीलांनी त्यांच्या जबाबामध्ये सदरचा अर्ज हा गुणवत्तारहित असून प्रकरणातील फिर्यादीमध्ये आरोपी क्र.४ चे नाव नमुद आहे. घटनेवेळी आरोपी हा घटनास्थळी हजर नसल्याचा जरी बचाव घेत असला तरी आरोपीने गुन्हा केला किंवा कसे ही बाब संपरिक्षेअंती सिध्द होईल. प्रकरणाच्या या टप्यास आरोपीस दोषमुक्त करता येणार नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

६. अर्ज व त्यावर दाखल केलेला जबाब तसेच दोषारोपपत्राचे अवलोकनार्थ प्रस्तुतचा अर्ज निकाली काढतेवेळी खालील मुद्दे माझे विचारार्थ उपस्थित होतात.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | आरोपी क्र.४ संभाजी विठ्ठल खिल्लारे हा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २३९ नुसार दोषमुक्त होण्यास पात्र ठरतो काय ? | नकारार्थी |
| २. | आदेश काय ? | अर्ज नामंजूर करण्यात येत आहे. |

**<u>कारणमिमांसा</u>**

**<u>मुद्दा क्र.१ करीताः-</u>**

७. आरोपीच्या वतीने विव्दान वकील श्री.व्ही.जे.सवई यांनी असा युक्तिवाद

केला की, आरोपी क्र.४ हा आरोपी क्र.१ चा भाउ असून प्रकरणातील फिर्यादी ही त्याची भावजय आहे. फिर्यादीने आरोपी क्र.१ ते ४ यांच्याविरुध्द भा.दं.वि. कलम ४९८–अ, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये फिर्याद दाखल केलेली आहे. आरोपी क्र.१ व फिर्यादी यांचा विवाह दिनांक २८.०५.२०१५ रोजी झालेला आहे. परंतू आरोपी क्र.४ हा दिनांक २१.०३.२०१७ रोजीच्या केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल (गृह मंत्रालय) यांचे आदेशान्वये सैन्यामध्ये भरती झालेला आहे. लग्नाच्या वेळी त्याचे प्रशिक्षण चालु होते. सदरची बाब ही निशाणी ३८ वर दाखल केलेल्या गृहमंत्रालयाच्या आदेशान्वये सिध्द होत आहे. आरोपी क्र.४ ने फिर्यादीस कसल्याही प्रकारचा मानसिक किंवा शारीरिक छळ केलेला नाही. आरोपी क्र.४ याच्या नोकरीस बाधा निर्माण व्हावी या एकमेव कारणामुळे सदर आरोपीस या प्रकरणामध्ये खोटे गोवलेले आहे. अभिलेखावर आरोपी क्र.४ विरुध्द कसल्याही प्रकारचा पुरावा नसल्यामुळे आरोपीस दोषमुक्त करण्याची विनंती केली आहे.

८. याउलट सहा.सरकारी वकील श्री.बनसोडे यांनी असा युक्तिवाद केला की, फिर्यादीने आरोपी क्र.४ व इतर आरोपींविरुध्द मानसिक व शारीरिक छळाची तक्रार शिवूर पोलीस स्टेशन येथे दिलेली आहे. आरोपी क्र.४ ने फिर्यादीचा कशाप्रकारचा छळ केला आहे ही बाब संपरिक्षेअंती सिध्द होईल. प्रकरणाच्या या टप्यास आरोपी निर्दोष आहे असे मानता येणार नाही. सबब, प्रस्तुत अर्ज नामंजूर

करण्याची विनंती केली आहे.

९.        उभय पक्षांच्या वतीने करण्यात आलेला परस्पर विरोधी युक्तिवाद विचारात घेवून अभिलेखाचे काळजीपूर्वक अवलोकन केले. प्रकरणातील आरोपी क्र.४ याने त्याचे फिर्यादी सोबत असलेले नातेसंबंध नाकारलेले नाही. दिनांक १३.१२.२०१६ रोजीच्या प्रथम खबरी अहवालाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, फिर्यादीने तिच्या सासरच्या लोकांनी लग्नाच्या १५ दिवसानंतर विहीर खोदण्यासाठी एक लाख रुपये घेवून येण्यासाठी शारीरिक व मानसिक छळ केल्याची तक्रार केलेली आहे. सदरच्या तक्रारीमध्ये फिर्यादीने आरोपी क्र.४ संभाजी विठ्ठल खिल्लारे याचा विशेष करुन उल्लेख केलेला आहे. जरी फिर्यादीमध्ये फिर्यादीने आरोपी क्र.४ ने तिला कधी व कशाप्रकरे मानसिक छळ केला असल्याचे कथन केले नसले तरी सर्व आरोपींनी मिळून संगनमताने एक लाख रुपये मागणी करुन तिचा छळ केल्याचे तिच्या फिर्यादीमध्ये नमुद केलेले आहे. याउपर अभियोग पक्षाच्या इतर साक्षीदारांनी देखील त्यांच्या पोलीस जबाबामध्ये सर्व आरोपींनी फिर्यादीचा मानसिक व शारीरिक छळ केला असल्याचे नमुद केले आहे.

१०.        फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २३९ अन्वये दाखल केलेला अर्ज निकाली काढते वेळी अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द ठेवलेले दोषारोप हे संशयापलीकडे जावून सिध्द करणे अपेक्षित नाही असे कायदयाचे तत्व मा.सर्वोच्च

न्यायालय व मा.उच्च न्यायालयांनी बऱ्याचशा न्यायनिवाडयांमध्ये जाहीर केलेले आहे. सदरचे न्यायिक तत्व निश्चितच या प्रकरणामध्ये देखील लागू पडते. प्रस्तुतच्या प्रकरणामध्ये जरी आरोपी क्र.४ ने त्याला सैन्यामध्ये नोकरी असल्यामुळे त्याने फिर्यादीचा छळ केला नसल्याचे कथन केले असले तरी सदरची बाब संपरिक्षेच्या या टप्यास मान्य करणे अपरिपक्वतेचे ठरेल. आरोपींनी फिर्यादीचा मानसिक व शारीरिक छळ केला होता किंवा कसे ही बाब निश्चितच प्रकरणाच्या संपरीक्षेअंती सिध्द होईल. प्रस्तुत प्रकरणामध्ये आरोपी क्र.४ याचे नाव फिर्यादीमध्ये तर नमुद आहेच परंतू इतर साक्षीदारांनी देखील त्यांच्या पोलीस जबाबामध्ये त्याच्याविरुध्द कथन केलेले आहे. वरील परिस्थितीचा एकंदरीत विचार करता आरोपी क्र.४ विरुध्द प्रथमदर्शनी पुरावा अभिलेखावरती नाही असे मानता येणार नाही. त्यामुळे प्रकरणाच्या या टप्यास आरोपी क्र.४ हा दोषमुक्त होण्यास पात्र ठरत नाही. सबब, मी आरोपी क्र.४ च्या वतीने विव्दान वकील श्री.व्ही.जे.सवई यांनी केलेल्या युक्तिवादाशी सन्मानपूर्वक असहमती दर्शवून मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.२ करीताः–</u>**

११. मुद्दा क्र.१ च्या अनुषंगाने आरोपी क्र.४ हा दोषमुक्त होण्यास पात्र ठरत नसल्याचे सिध्द झाले आहे. त्यामुळे मी मुद्दा क्र.४ च्या उत्तरादाखल पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

आरोपी क्र.४ संभाजी विठ्ठल खिल्लारे याचा दोषमुक्ती (discharge) चा अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

स्वाक्षरीत/-

दिनांकः १४/०६/२०१९.                ( वाय.जे. तांबोळी )

वैजापूर.                प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, वैजापुर.

न्यायालय क्र.०२

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | : R.V. Patil, |
| Court | : Shri. Y.J. Tamboli<br>J.M.F.C., Court No.2, Vaijapur,<br>Dist. Aurangabad. |
| Date | : 14.06.2019 |
| Order signed by the presiding officer on | : 14.06.2019 |
| Order uploaded on | : 15.06.2019 |